**सं.फौ.ख.क्र.७५०/२०१९**
**राजलक्ष्मी..वि..भागेश**

## <u>नि.क्र.१ वरील आदेश</u>

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. निरीक्षणे–१ B(Gen)-1001/2026/ 223Dt.18/02/2026, तसेच जिल्हा न्यायालय,यवतमाळ यांचे पत्र जा.क्र.१११०/सांख्यीकी/२०२६ दि.२०/०२/२०२६ नुसार दि.09/03/2026 ते दि.13/03/2026 या कालावधीमध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५६(भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७९) व २५८(भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २८१) अन्वये प्रकरणे निकाली काढण्याकरिता विशेष मोहिम राबविण्याबाबत आदेशित केलेले आहे.

२. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तूत खटला आरोपी विरुध्द निगोशीएबल इनस्ट्रुमेंट ॲक्ट, १८८१ चे कलम १३८ अन्वये दाखल झाला आहे. सदरचा खटला खारीज करणेकरिता प्रलंबित आहे. पुरेशी संधी देवुन देखील तक्रारकर्ताने आरोपीची उपस्थिती सुनिश्चित केलेली नाही. खटल्याचे स्वरुप पाहता सदर खटल्याची पुढील कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५६ नुसार विशेष मोहिमेअंतर्गत बंद करणे आवश्यक आहे. करीता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत खटल्याची पुढील कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५६ नुसार बंद करण्यात येते.
२. आरोपी नामे– भागेश दत्तात्रय गावंडे यांची निगोशीएबल इनस्ट्रुमेंट ॲक्ट, १८८१ चे कलम १३८ या दोषारोपातून मुक्त करण्यात येत आहे.

स्वा/–
(रोशनी दिपक चौबे)
प्र.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आर्णी
न्यायालय क्र.१

दिनांक १२/०३/२०२६